दाखल तारीख : ३०/१०/२०१८
नोंदणी तारीख : ३०/१०/२०१८
निकाल दिनांक : ११/११/२०२२
कालावधी : वर्ष महिने दिवस
०४ ०० १२

***CNR-MHSN06004012-2018***

**मिरज येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात, मिरज, तालुका मिरज, श्रीमती एम. एस. मनगुळी)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६०४/२०१८**
**निशाणी क्रमांक : ३३**

**महाराष्ट्र सरकार तर्फे**
**मिरज ग्रामीण पोलीस ठाणे,**
**तालुका–मिरज, जिल्हा–सांगली .... फिर्यादी.**

**–विरुद्ध–**

सुरेश शिवाजी नरळे
वय.३६, व्यवसाय- ड्रायव्हर,
रा. पिपळवाडी,तालुका–कवठे महांकाळ,
जिल्हा– सांगली .... **आरोपी.**

गुन्हा : ***भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे***

....................................................................................

**अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ : श्रीमती डी. बी. पाटील**

**आरोपीतर्फे विधीज्ञ : श्री. एस. एस. हांगड**

....................................................................................

## न्यायनिर्णय
## (दिनांक ११/११/२०२२)

प्रस्तुत केसमधील आरोपीवर भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

०२. अभियोगपक्षाचे कथन खालीलप्रमाणे -

अभियोगपक्ष कथन करतात की, शंकर सुभाष वाळके यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दिली आहे. दि.३०.०७.२०१८ रोजी रात्री ०८.३० वाजणेच्या सुमारास मौजे मिरज ते पंढरपूर जाणाऱ्या हायवे रोडवर, पंजाबी ढाब्याच्या समोरील डांबरी रोडवर, ता. मिरज, जि. सांगली येथे फिर्यादी व त्यांचा पाहुणा विकास गजानन जाधव असे मोटर सायकल क्र.एम.एच.–१० ए.के.–७९२३ वरुन दोघेजण कळंबीकडे चालले होते. फिर्यादी पाठीमागे बसले होते. त्यांच्या मोटार सायकलच्या पाठीमागून एक डंपर क्र. एम. एच. १०–२४८८१ जोरात आला व त्यांच्या मोटार सायकलला ठोकरुन, डंपर झाडाला जाऊन आदळला. त्यामुळे फिर्यादी पाठीवर कुचले गेले व त्यांच्या हाताच्या खांद्याजवळ फ्रॅक्चर झाले. तसेच फिर्यादीच्या हाताला, पायाला, खांद्याला खरचटले व मुक्कामार लागला. अज्ञात इसमाने त्याच्या ताब्यातील डंपर क्र.एम.एच.१०–२४८८१ हा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगईने, अविचाराने व भरधाव वेगात चालवून त्याच्या समोरील बाजूने कळंबीकडे चाललेल्या मोटर सायकल क्र.एम.एच.–१० ए.के.–७९२३ ला पाठीमागील बाजूस धडक देऊन अपघात करुन अपघातामध्ये मोटर सायकलवर पाठीमागे

बसलेले फिर्यादी शंकर सुभाष वाळके यांना जखमी करणेस, तसेच मोटर सायकल व डंपर चे नुकसान करणेस कारणीभूत झाला म्हणून फिर्यादीने मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे जाऊन अज्ञात इसमा विरुध्द फिर्याद दिली. सदरची फिर्याद ही गु.र.क्र. १०६/२०१८ खाली भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नोंदविले. पुढील तपासासाठी श्री.ए.एस.पवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल, मिरज ग्रामीण पोलीस ठाणे यांना वर्ग केले.

०३. तपासीक अंमलदार यांनी फिर्यादी अन्वये घटनेचा तपास केला. घटनास्थळाचा पंचनामा, मोटार सायकल व डंपर यांची कागदपत्रे व लायसन्स, तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन अभिलेखावर दाखल केले. तसेच साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्यामुळे भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे अंतिम अहवाल न्यायालयात दाखल केला.

०४. आरोपी हा त्यांच्या विधीज्ञांसह हजर झाला. जामीनावर मुक्तता केली. नि.क्र.१३ वरती आरोपीविरुध्द दोषारोप निश्चीत केले. आरोपीने सदर दोषारोप नाकबुल केले व प्रकरण गुणदोषावर चालवण्याची विनंती केली. परंतु नि.क्र.२१ वर फिर्यादी शंकर सुभाष वाळके यांची साक्ष तसेच नि.क्र.२४ वर साक्षीदार संदीप दिलीप वाळके यांची साक्ष नोंदवण्यात आली. तसेच सदर कामी आरोपीच्या हुशार विधीज्ञांनी घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्र अहवाल इत्यादी मान्य केले. मात्र सदरचा साक्षीदार हा अभियोगपक्षास

समर्थन न केल्यामुळे अभियोगपक्षाने साक्षीदाराचा उलटतपास नोंदविला. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार घटनेबाबत काहीही कथन करत नाही. आरोपीच्या हुशार विधीज्ञांनी घटनास्थळ पंचनामा तसेच वैद्यकीय अहवाल मान्य केला आहे. म्हणून पुढील साक्षीदार तपासले असता अभियोगपक्षाच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. म्हणून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात येत आहे. तसेच नि.क्र.०१ खाली आदेश पारीत केला. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब नोंदविण्यात आला.

०५. अभियोगपक्षाचे कथन उपलब्ध साक्षीपुरावा लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थीत होत आहेत. सदर मुद्यांची कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | दि.३०.०७.२०१८ रोजी रात्री ०८.३० वाजणेच्या सुमारास मौजे मिरज ते पंढरपूर जाणाऱ्या हायवे रोडवर, पंजाबी ढाब्याच्या समोर डांबरी रोडवर, ता. मिरज, जि. सांगली येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील डंपर क्र.एम.एच.१०–२४८८१ हा हयगईने, अविचाराने व भरधाव वेगाने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मानवी जिवीतास धोका होईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला गंभीर दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल अशा पध्दतीने चालवून भारतीय दंड विधान कलम २७९ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे का? | **नकारार्थी** |
| ०२ | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद डंपर हा निष्काळजीपणे, हायगईने व भरधाव वेगाने चालवून मोटार सायकलवर पाठीमागे बसलेले फिर्यादी शंकर | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | सुभाष वाळके यांना जखमी केल्याची बाब अभियोगपक्षाने भारतीय दंड विधान संहिता कलम ३३७ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे का? | |
| ०३ | वर नमूद तारीख, वेळ आणि ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद डंपर हा निष्काळजीपणे, हायगईने व भरधाव वेगाने चालवून मोटार सायकलवर पाठीमागे बसलेले फिर्यादी शंकर सुभाष वाळके यांना धडक देऊन त्यांना गंभीर दुखापत केल्याची बाब भारतीय दंड विधान कायदा कलम ३३८ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे का? | **नकारार्थी** |
| ०४ | वर नमूद तारीख, वेळ आणि ठिकाणी आरोपीने वर नमूद वाहन भरधाव वेगाने, हयगईने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थिती कडे व नियमांकडे दुर्लक्ष करून, खोडासाळपणाने फिर्यादीच्या मोटास सायकलला धडक देऊन अपघातातील मोटार सायकलीचे व डंपरचे नुकसान केले, म्हणून त्याने भारतीय दंड विधान कायदा कलम ४२७ अन्वये गुन्हा केला हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे का? | **नकारार्थी** |
| ०५ | वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्यांच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, हायगईने व निष्काळजीपणाने, सार्वजनिक रस्त्याचे वापर करणा–या जनतेच्या जिवनास धोका उत्पन्न होईल अशा प्रकारे चालवली म्हणून त्याने मोटारवाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे का? | **नकारार्थी** |
| ०६. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ बाबत :**

**०६.** मुद्दे क्र ०१ ते ०५ यांची कारणमिमांसा एकमेकाशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत विवेचन केले आहे. अभियोगपक्षाची बाजू सिद्ध करण्यासाठी दोन साक्षीदार तपासले आहेत. आरोपीपक्षाने घटनास्थळ पंचनामा व जखमेचे प्रमाणपत्र इ. कागदपत्र मान्य केले आहेत. फिर्यादी साक्षीदार क्र.०१ सुभाष शंकर वाळके यांच्या तोंडी पुराव्यावरुन असे दिसून येते की, सदरची घटना चार वर्षोपूर्वी कळंबीजवळ पंजाबी धाब्यासमोर सायंकाळी साडेसहा वाजणेच्या सुमारास घडल्याचे कथन केले आहे. घटने दिवशी ते त्यांच्या दुचाकीवरुन मिरज येथून त्यांच्या घरी कळंबी येथे जात असताना पंजाबी धाब्यासमोर आले होते त्यावेळी पाठीमागून त्यांच्या मोटर सायकलकला धडक बसल्याचे कथन करतात. सदरची धडक बसल्यानंतर काय झाले याबाबत त्यांना काही माहिती नसल्याचे, तसेच त्यानंतर ते बेशुध्द पडल्याचे कथन करतात. तसेच ज्यावेळी त्यांना शुध्द आली त्यावेळी ते डॉ. संजीव कुलकर्णी यांच्या हॉस्पिटलमध्ये ॲडमीट झाल्याचे तसेच त्यांच्या मानेला व पाठीला अपघातामुळे दुखापत झाल्याचे कथन करतात. पोलिसांनी त्यांचा जबाब हॉस्पीटलमध्ये नोंदवल्याचे ते मान्य करतात. जबाबावर व छापील एफ.आय.आर. वर सहया असल्याचे ते मान्य करतात, परंतु त्यातील मजकूर त्यांना माहीत नसल्याचे कथन करतात. त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांनी दि.३०.०७.२०१८ रोजी ते रात्री ०८.३० वाजणेच्या सुमारास मिरज येथून कळंबीकडे जात असल्याचे मान्य करतात,

परंतु त्यावेळी त्यांचा पाहुणा विकास जाधव हा त्यांच्यासोबत असल्याचे पुर्णपणे नाकारले आहे. तसेच त्यांच्याकडे दुचाकी चालविण्याचा परवाना नसल्यामुळे सदरची मोटरसायकल ही त्यांचा पाहुणा चालवीत असल्याचे नाकारले आहे. तसेच ते पंजाबी धाबा येथे ते आले असता, त्यांच्या दुचाकीस एका डंपरने धडक दिल्याचे अमान्य करतात. परंतु ते सदर अपघातामध्ये कुचल्याचे व हाता–पायाला खरचटल्याचे, तसेच दुचाकीचे नुकसान झाल्याचे मान्य करतात. तसेच त्यांच्या वर्दी जबाबातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे व त्यावरील सही ते मान्य करतात, परंतु त्यातील मजकूरापैकी अधोरेखांकीत भाग वर्दीजबाबात का नमूद केला याचे कारण ते सांगू शकत नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्यांनी त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे, सदरचे प्रकरण मिटवायचे असल्याचे मान्य केले. सदर अपघातामुळे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई मिळाली असल्याचे मान्य करतात. तसेच त्यांना आरोपीविरुध्द केस चालवायची नसल्याचे मान्य केले आहे. साक्षीदार क्र.०२ संदीप दिलीप वाळके यांची साक्ष नि.क्र.२४ वर नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये घटना ही सन २०१८ साली पंढरपूर–मिरज रोडवर, पंजाबी धाब्यासमोर रात्री ०८.३० वाजण्याच्या सुमारास घडल्याचे, शंकर वाळके हे त्यांचे चुलत भाऊ असल्याचे कथन करतात. अपघातास्थळी त्यांना शंकर वाळके हे रस्त्यावर पडल्याचे, त्यांच्या मानेस जखम झाल्याचे कथन करतात. त्यांनी झाडावर आदळलेला एक डंपर पाहिला होता, परंतु त्यांना त्याचा नंबर सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. त्यांना पोलिसांकडून डंपरचा चालक हा सुरेश नरळे असल्याचे समजले होते. परंतु घटनास्थळी सुरेश नरळे उपस्थित नसल्याचे कथन करतात. सदर अपघातामध्ये त्यांच्या

भावाला खांद्याला व पायांना दुखापत झाल्याचे कथन करतात. त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये पोलिसांनी त्यांचा जबाब डॉ. कुलकर्णी यांच्या हॉस्पिटल मध्ये घेतल्याचे, त्यानंतर पोलिसांनी कधीही त्यांचा जबाब नोंदविला नसल्याचे मान्य करतात. ज्या रस्त्यावर अपघात झाला होता तो वर्दळीचा रस्ता व राष्ट्रीय महामार्ग असल्याचे, सदर महामार्गावर मोठया गाडयांची वाहतूक होत असते हे मान्य करतात. तसेच त्यांनी सदरचा अपघात प्रत्यक्ष डोळयांनी पाहिला नसल्याचे मान्य केले आहे. पोलिसांनी त्यांना दिलेल्या माहितीवरुन त्यांनी पोलिसांना त्यांचा जबाब दिल्याचे मान्य करतात. फिर्यादीला नुकसान भरपाईची रक्कम परत मिळाल्यामुळे त्यांची काही तक्रार नसल्याचे कथन करतात. सदरचा साक्षीदार हा अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्यामुळे न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारांचा उलटतपास नोंदविला. घटनेच्या अनुषंगे फिर्यादीस वारंवार सुचना केल्या. परंतु त्यांनी सर्व सुचना नाकारल्या. केवळ फिर्यादी व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. प्रकरण आपसात मिटल्यामुळे सध्या त्यांचा आरोपीविरुध्द वाद नाही. त्यांना पुढे आरोपीविरुध्द तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा द्यायचा नाही, केस चालवायची नाही असे कथन करतात. फिर्यादी व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे लक्षात घेता मी फिर्यादीविरुध्द कायदेशीर कारवाई करीत नाही. तसेच साक्षीदार क्र.०२ हे घटनास्थळी उपस्थित नव्हते. ज्या रस्त्यावर अपघात झाला होता तो वर्दळीचा रस्ता व राष्ट्रीय महामार्ग असल्याचे तसेच सदर माहमार्गावर मोठया गाडयांची वाहतूक होत असते. तसेच त्यांनी सदरचा अपघात प्रत्यक्ष डोळयांनी पाहिला नव्हता, ते प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. तसेच फिर्यादी हे तडजोडीमुळे आरोपीविरुध्द काहीही कथन

करत नाहीत. अभियोगपक्षाने त्यांचा उलटतपास नोंदविला. परंतु उलटतपासात देखील त्यांनी सर्व सुचना नाकारल्या.

०७. सदर कामी फिर्यादीने तोंडी पुराव्यात त्यांना सदरची केस काढून घेण्याचे कथन केले आहे. फिर्यादी हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे, आरोपीपक्षाने घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केल्यामुळे इतर साक्षीदार तपासल्यास अभियोगपक्षाच्या गुणदोषांवर कोणताही परिणाम होणार नाही. इतर साक्षीदार तपासणे हे निरर्थक वाटत आहे. म्हणून मी अभियोगपक्षाचा पुरावा बंद करुन तसा नि.क्र.०१ वर आदेश पारीत केला आहे. अभियोगपक्षाला सदरचे साक्षीदार सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्ष हे दि.३०.०७.२०१८ रोजी रात्री ०८.३० वाजणेच्या सुमारास मौजे मिरज ते पंढरपूर जाणाऱ्या हायवे रोडवर, पंजाबी ढाब्याच्या समोर डांबरी रोडवर, ता. मिरज, जि. सांगली येथे अज्ञात डंपरने धडक दिल्यामुळे सदरचा अपघात घडला असे दिसून येत आहे. परंतु डंपर क्र. एम.एच.१०–२४८८१ हा हयगईने, अविचाराने व भरधाव वेगाने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन फिर्यादी शंकर सुभाष वाळके यांना गंभीर दुखापत केली, सदरचे डंपर हे अपघताच्या दिवशी आरोपीच्या ताब्यात होते ही बाब शंकेपलिकडे जाऊन सिद्ध करण्यास असमर्थ ठरत आहे. म्हणून मी न्यायतर्कशास्त्रानुसार शंकेचा फायदा आरोपीपक्षास जातो. आरोपी हा सदर आरोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ०१ ते ०५ चे उत्तर नकारार्थी नोंदवीत आहे व मुद्दा क्र. ०६ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** आरोपी सुरेश शिवाजी नरळे याला भारतीय दंड विधान कलम २७९,३३७, ३३८, ४२७ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे या गुन्हयांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करीत आहे.

**०२.** आरोपीचा जामीनकदबा व बंधपत्र हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) केवळ अपील कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे.

**(न्यायालयासमोर घोषीत करण्यात आले)**

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI Date: 2022.11.11 12:21:05 +0530

ठिकाण : मिरज ( श्रीमती एम. एस. मनगुळी )

दिनांक : ११/११/२०२२. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Smt. S. P. Patil |
| Name of Court | :- | Smt. M. S. Managuli,<br>3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Miraj, Dist.Sangli. |
| Judgment signed by the | : | 11/11/2022. |
| presiding officer on | : | 11/11/2022. |
| **Judgment uploaded on** | **:** | **11/11/2022.** |